बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर समिती .......

रचना व कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. सीआयएम/१०९१/सीआर १७२/९१/एमईडी-८,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ सप्टेंबर, १९९१.

## शासन निर्णय

जुलै-ऑगस्ट, १९९१ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये बोगस वैद्यकीय व्यावसायिकांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना तसेच अल्पसूचना प्रश्न उपस्थित करण्यांत आले होते. सदर चर्चेला उत्तर देताना बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी समिती नेमण्याबाबत निर्णय घोषित करण्यांत आला होता. सदर निर्णयास अनुसरून शासन खालीलप्रमाणे जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर, तसेच महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर समिती स्थापन करण्याचे आदेश देत आहे.

[अ] जिल्हास्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १] जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २] जिल्हा शल्यचिकित्सक | - | सदस्य |
| ३] जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य सचिव |

[ब] तालुकास्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १] गट विकास अधिकारी | - | अध्यक्ष |
| २] आरोग्य विस्तार अधिकारी [पंचायत समिती] | - | सदस्य |
| ३] तालुका स्तरावरील वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य सचिव |

[क] महानगरपालिका स्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १] महानगरपालिका आयुक्त | - | अध्यक्ष |
| २] महानगरपालिका आरोग्य अधिकारी | - | सदस्य सचिव |

[ड] नगरपालिका स्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १] मुख्य अधिकारी [नगरपरिषद] | - | अध्यक्ष |
| २] आरोग्य अधिकारी [नगरपरिषद] | - | सदस्य सचिव |

19 SEP 1991

२. सदर समितीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील :-

[१] बोगस वैद्यकीय व्यावसायिकांबाबत माहिती गोळा करण्यांत यावी व तदनंतर ती तालुका स्तरीय समितीने जिल्हा स्तरीय समितीस कळवावी. जिल्हा स्तरीय समितीमार्फत ही माहिती पोलीस खात्यास पाठविण्यात यावी.

[२] महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अशीच माहिती गोळा केल्या-नंतर ही समिती सदर माहिती सरळ पोलीस खात्यास पाठविल. सदर माहिती जिल्हा स्तरावरील समितीकडे फक्त माहिती होण्याकरिता पाठवावी.

[३] नगरपालिकेतील माहिती त्या त्या तालुका स्तरावरील समितीकडे पाठवावी व तालुका समितीने जिल्हा स्तरावरील समितीकडे पाठवावी.

[४] जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका असेल तर सदर माहिती जिल्हा स्तरावरील समितीकडे पाठवावी व नंतर त्या समितीने गोळा केलेली माहिती पोलीस खात्याकडे पाठविण्यात यावी.

[५] ग्रामीण भागामध्ये आरोग्य विस्तार अधिकारी[पंचायत समिती] प्रत्येक ग्राम पंचायतीस भेट देऊन ग्राम पंचायतीच्या सरपंचाकडून बोगस वैद्यकीय व्यावसायिकां-बाबत माहिती गोळा करतील व ही माहिती तालुका समितीस पाठविण्यात यावी.

[६] तालुक्याच्या शहरी भागातील माहिती त्या शहरामध्ये नगरपालिकेचे आरोग्य कर्मचारी गोळा करतील व मुख्य अधिकाऱ्यास सादर करतील. मुख्य अधिकारी, नगरपालिका ही माहिती तालुका स्तरावरील समितीस सादर करतील.

[७] महानगरपालिकेचे क्षेत्रात आरोग्य अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली असलेले कर्मचारी वरील माहिती गोळा करून महानगरपालिका स्तरावरील समितीस सादर करतील व नंतर ती समिती गोळा केलेली माहिती पोलीस खात्यास सादर करतील.

सदर समिती आपापल्या क्षेत्रामधील माहिती गोळा करण्यासाठी कालबद्ध क्रम हाती घेऊन दोन महिन्यांमध्ये याबाबतची माहिती गोळा करून ती ीत पोलीस खात्यास पाठविल. तसेच संबंधित बोगस वैद्यकीय व्यावसायिकांची हिती शासनाकडे पाठविण्यात यावी.

४. सदर आदेश संबंधित विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दीनानाथ ठकार,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

ति,

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई,
प्रशासक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथिक, मुंबई,
... महानगरपालिका,
सर्व नगरपालिका परिषदा,
स॰ जिल्हा परिषदा,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व गटविकास अधिकारी [पंचायत समिती].